## तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, कार्यालय मिरज

पत्ता-किल्लाभाग मिरज,फोन0233-22222682, ईमेल – mirajtahsildar@gmail.com

क्र/एमएजी/कावी/1658/2019 दि. 19/07/2019

**प्रति,**

**सर्व संबंधित पोलीस निरीक्षक**

1) मिरज शहर पोलीस ठाणे, 2) मिरज ग्रामीण पोलीस ठाणे, 3) सांगली शहर पोलीस ठाणे 4) सांगली ग्रामीण पोलीस ठाणे, 5) म. गांधी चौक पोलीस ठाणे, 6) कुपवाड MIDC पोलीस ठाणे, 7) संजयनगर पोलीस ठाणे, 8) विश्रामबाग पोलीस ठाणे,

**विषय-** घटना स्थळाचा नकाशान काढणेबाबत.

**संदर्भ-** महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग पीरपत्रक क्र. सीओएनझ १९८४/१५८३४४/ ३४४९ल १ मंत्रालय मुंबई दिनांक २० जुलै १९८४.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविणेत येते की, आपल्या अआपल्या पोलीस ठाणे मार्फत घटनासथळाचा नकाशा काढणेबाबतची पत्र या कार्यालयात वारंवार दाखल होत आहेत. परंतु संदर्भिय पत्रान्वये व मुंबई पोलीस नियमावली १९५९ च्या भाग ३ मधील परिशिष्ट १० मध्ये फौजादरी दाव्यातील गुन्हयाच्या जागेचा नकाशा काढणेबाबत स्पष्ट तरतुद करणेत आलेली आहे. त्या तरतुदीनुसार असे नकाशा काढण्याचे तांत्रीक ज्ञान ज्या व्यक्तींना आहेत. त्यांनी गुन्हेशाच्या स्थळाचे नकाशे काढणे अपेक्षीत व योग्य आहे. त्यामुळे मंडळ अधिकारी यांना याबाबत सक्ती करता येणार नाही.

तसेच त्यांना याबाबत तांत्रिक ज्ञानही संदर्भिय पत्रान्वये गुन्हा घटनासथळाचा नकाशा कोणी काढावा याबाबत शासनाने स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार तांत्रीक ज्ञान असणारे भुमापक यांचेकडुन घटनास्थळाचे नकाशे काढुन घेणे अभिप्रते आहे. सबब यापुढे याबाबतची पत्रे या कार्यलयाकडे पाठविण्यात येऊ नये.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसिलदार मिरज

प्रत- १) मा. जिल्हाधिकारीसो सांगली यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. पोलीस अधिकक्षकसो, सांगली यांना माहितीसाठी सविनय सादर
३) मा. उपविभागीय अधिकारीसो, मिरज उपविभाग मिरज यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) मा. उपविभागीय पोलीस अधिकारीसो, मिरज यांना माहितीसाठी सविनय सादर.
५) सर्व मंडळ अधिकारी, मिरज तालुका यांना माहितीसाठी.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसिलदार मिरज

Scanned by CamScanner